# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१८ – १९

**साहेबरावजी बुट्टपाटील स्मृती व्याख्यानमाला**

10:42 AM ...0.00KB/s 4G 3G 38%

सकाळ

# सांडभोरवाडीचा भूषण पोलिस उपनिरीक्षकपदी



**भूषण सांडभोर**

**राजगुरुनगर, ता. १० :** सांडभोरवाडी (पानमळा) येथील शेतकरी कुटुंबातील भूषण शंकर सांडभोर या तरुणाने पोलिस उपनिरीक्षक होण्याचा बहुमान मिळविला आहे.

नुकत्याच जाहीर झालेल्या २०१७ सालच्या, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या पोलिस उपनिरीक्षक परीक्षेच्या अंतिम निकालातून भूषण सांडभोर याची राज्यात ८८ व्या क्रमांकाने निवड झाली. भूषणचे वडील शंकर ऊर्फ दादाभाऊ सांडभोर हे शेतकरी आहेत. त्याने येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातून राज्यशास्त्र विषय घेऊन बी.ए. पदवी २०१६ मध्ये संपादन केली. त्यानंतर कोणताही कोचिंग क्लास न लावता, राजगुरुनगर नगरपरिषदेच्या अभ्यासिकेमध्ये अध्ययन केले.

त्याला हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे प्रा. डी. डी. मुळूक आणि प्रा. डॉ. संजय शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले. भूषणला शारीरिक चाचणीत १००पैकी १०० गुण मिळाले आहेत.

Pune, District-Today
11/03/2019 Page No. 4

# सांडभोरवाडीचा भूषण पोलिस उपनिरीक्षकपदी



भूषण सांडभोर

**राजगुरुनगर, ता. १० :** सांडभोरवाडी (पानमळा) येथील शेतकरी कुटुंबातील भूषण शंकर सांडभोर या तरुणाने पोलिस उपनिरीक्षक होण्याचा बहुमान मिळविला आहे.

नुकत्याच जाहीर झालेल्या २०१७ सालच्या, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या पोलिस उपनिरीक्षक परीक्षेच्या अंतिम निकालातून भूषण सांडभोर याची राज्यात ८८ व्या क्रमांकाने निवड झाली. भूषणचे वडील शंकर ऊर्फ दादाभाऊ सांडभोर हे शेतकरी आहेत. त्याने येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातून राज्यशास्त्र विषय घेऊन बी.ए. पदवी २०१६ मध्ये संपादन केली. त्यानंतर कोणताही कोचिंग क्लास न लावता, राजगुरुनगर नगरपरिषदेच्या अभ्यासिकेमध्ये अध्ययन केले.

त्याला हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे प्रा. डी. डी. मुळूक आणि प्रा. डॉ. संजय शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले. भूषणला शारीरिक चाचणीत १००पैकी १०० गुण मिळाले आहेत.

# भूषण सांडभोरची पोलीस उपनिरीक्षकपदी निवड



**राजगुरुनगर, (वार्ताहर)** : येथील हुतात्मा राजगुरु महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी भूषण शंकर सांडभोर हा नुकत्याच जाहीर झालेल्या २०१७ सालच्या महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या पोलीस उपनिरीक्षकपदाच्या परीक्षेत राज्यात ८८व्या क्रमांकाने उत्तीर्ण झाल्याबद्दल खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांच्या हस्ते त्याचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, प्रबंधक कैलास पाचारणे, स्पर्धा परीक्षा केंद्राचे प्रमुख प्रा.दिलीप मुळूक, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. मच्छिंद्र मुळूक उपस्थित होते.

भूषणने २०१६ साली विशेष प्राविण्यासह बी.ए.ची पदवी संपादित केली असून महाविद्यालयातील स्पर्धा परीक्षा विभागात अभ्यास केला. त्याने कोणतीही खाजगी शिकवणी न लावता स्वयंप्रेरणेने अभ्यास करून हे यश प्राप्त केले. भूषणला शारीरिक चाचणीत १०० पैकी १०० गुण मिळाले आहेत. तो सांडभोरवाडी (पानमळा) येथील रहिवासी असून त्याचे वडील शंकर सांडभोर हे शेतकरी आहेत.

भूषण सांडभोर याचे कौतुक करताना ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील म्हणाले की, भूषणचा प्रवास कौतुकास्पद असून ग्रामीण भागातील स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आहे. त्याचा आदर्श घेताना विद्यार्थ्यांनी अभ्यासातील सातत्य, प्रचंड कष्ट करण्याची तयारी, जिद्द, स्वतःवरील विश्वास आदि गुणांचा अवलंब करण्याचे आवाहन केले.

या प्रसंगी बोलताना भूषण सांडभोर म्हणाला की, माझ्या यशात महाविद्यालयातील स्पर्धा परीक्षा केंद्राचा मोठा वाटा आहे. या परीक्षेत यश मिळवण्यासाठी संघर्ष करण्याची गरज असून त्यासाठी संयम खूप महत्त्वाचा आहे. विचलित न होता आपण सातत्याने प्रयत्नशील राहिलो तर यश नक्कीच मिळते, अशी भावना त्याने व्यक्त केली. त्याच्या या यशाबद्दल संस्थेचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, सर्व संचालक, प्राध्यापक, प्रशासकीय सेवक, विद्यार्थ्यांनी त्याचे अभिनंदन केले.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख